# प्रेसनोट

## जिल्हाधिकारी कार्यालयात आधार नोंदणीची माहिती देणारे ऑनलाईन मदत केंद्रची स्थापना

## जिल्हाप्रशासनाचे आवाहनः जिल्हयातील नागरिकाना आधार नोंदणीचा लाभ घ्यावा.

प्रत्येक नागरिकांना आपली स्वतंत्र ओळख (युआयडी) निर्माण करण्यासाठी आधार नोंदणी करण्याची मोहिम शासनाकडून राबविण्यात येत आहे. आधार कार्ड हे शासनाच्या सर्व योजनेसाठी दयावे लागते, जसे की, राशनकार्ड, संजय गांधी योजना, रोजगार हमी योजना, बॅकेच्या कामा करीता व विविध शासनाच्या याजनेकरीता आधार कार्ड क्रमांक सिंडीग करुन नागरिकांना योजनेचा लाभ घेता येतो. वरिल सर्व योजनेचा लाभ नागरिकांना मिळावा याकरीता शासनाने आधार नोंदणीचा कार्यक्रम सर्वत्र राबवित आहे. जिल्हयात आधार नोंदणी ९२ टक्के म्हणजेच २७ लाख नागरिकांची आधार नोंदणी झाली आहे. तर उर्वरित दोन लाख चोविस हजार नागरिकांचे आधार नोंदणी करण्याकरीता जिल्हात १८० संच कार्यरत करण्यात आले आहे. सर्व संच प्रत्येक तालुकास्तावर व गावास्तरावर सुरु आहे. तसेच कार्यरत संच धारकांची यादी जिल्हयाच्या सकेस्थस्थाळावर उपलब्ध आहे. त्यातील काही आधार नोंदणी संच तालुका स्तरावरील तहसिल कार्यालयात स्थायीस्वरुपात लावण्यात आले आहे व काही संच मंडळ निहाय गावात लावण्यात आले आहे. तसेच दर रविवारी सर्व तहसिल कार्यालयात भव्य आधार नोंदणी कॅम्प राबविण्यात येत आहे. ज्या नागरिकांना आता रहिवाशी प्रमाणपत्र व ओळख प्रमाणपत्र नाही अशा नागरिकांना तहसिलदार यांचे कडून विहित नमुन्यामध्ये अर्ज करुन प्रमाणपत्र देण्यात येईल. रहिवाशी प्रमाणपत्र व ओळख प्रमाणपत्र हा नमुना www.yavatmal.nic.in या संकेत स्थळावर नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे,तसेच आधार नोंदणीसाठी लागणारे कागदपत्रे व संपुर्ण प्रक्रीया व अर्जाचा नमुना संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. नागरिकांनी संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यात अर्ज करुन तहसिलदार यांचे कडून रहिवाशी प्रमाणपत्र व ओळख प्रमाणपत्र घ्यावे असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

नागरिकांच्या आधार कार्ड विषयी विविध अडचणी लक्षात घेता जिल्हाधिकारी कार्यालयात एक आधार मदत केंद्र उघडण्यात आले आहे. नागरिकांनी आधार कार्ड विषयी माहिती किवा अडचणी असेल त्या नागरिकांनी 9405422200 या मोबाईल नंबर वर WhatsApp वर किंवा Sms व्दारे इमेज व संदेश पाठवून शकतील, संदेश पाठविताना आधार नोंदणी पावतीचा २८ आकडी नंबर किंवा पावती **Scan** करुन पाठवू शकता. आधार विषयी माहिती मागताना आधार नोंदणीकरीता नागरिकांनी आपल्या आधार नोंदणी करताना दिलेल्या रजिस्टर मोबाईन नंबर वरुनच WhatsApp वर किंवा Sms व्दारे संदेश पाठवून शकता. इतर मोबाईल नंबर करुन WhatsApp वर किंवा Sms व्दारे संदेश पाठविताना कोणत्याही एक ओळख पत्र Scan करुन पाठवावे. आधार नोंदणी पावती आहे, पण त्यांचे आधार कार्ड अद्यापपर्यंत प्राप्त झाले नाही अशा नागरिकांनी संदेश पाठवू शकतात. कृपयां नागरिकांना विनंती करण्यात येते की, या मोबाईल नंबर वर फोन करुन नये. तसेच हि सेवा फक्त यवतमाळ जिल्हयातील नागरिका करीता आहे. या आधार मदत केंद्रामध्ये फक्त आधार कार्ड जनरेट झाले की नाही किंवा रिजेक्ट झाले असेल तर नविन आधार नोंदणी करावयाची की नाही यांची माहिती देण्यात येईल. इतर जिल्हयाच्या नागरिकाना माहिती दिल्या जाणार नाही, यांची कृपया नोंद घ्यावी. इतर कोणतेही इमेज किंवा संदेश पाठवू नये. तरी नागरिकांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी, यवतमाळ

क्र./क.लि/आधार/कावि/ ११७३ /२०१६
जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ
दिनांक - २७/१२/२०१६